## NCC Activities Report-2020-21

एनसीसी विभागामार्फतया या वर्षी १५ मुली आर्मी व १६ मुलगे आणि ४ मुली नेव्ही विंग मध्ये भर्ती करण्यात आल्या तसेच १३ नेव्हल विंगमधील मुलगे आपले ३ वर्षांचे प्रशिक्षण पूर्ण करून C cert परिक्षेला बसले आहेत. त्यामुळे आता महाविद्यालयामधील एकूण एनसीसी छात्रांची संख्या ८५ झाली आहे. महाविद्यालय स्वायत्त असल्याने विद्यार्थ्यांना एनसीसी हा ऐच्छिक विषय म्हणून उपलब्ध आहे.

कॅडेट कॅप्टन कल्पेश मिरगल हा पुणे येथील RD निवड कॅम्पमध्ये तसेच लीडिंग कॅडेट मिहीर शिंदे हा एक भारत श्रेष्ठ भारत या ओनलाईन कॅम्पमध्ये सहभागी झाला होता. कोव्हीडमुळे यंदा वार्षिक प्रशिक्षण शिबीर होणे शक्य नसल्याने B व C cert परिक्षांच्या तयारीकरिता महाविद्यालयामध्ये B cert करिता ३ व C cert करिता ५ दिवशीय अनिवासी प्रशिक्षण वर्ग २५ ते २९ जानेवारी दरम्यान घेण्यात आले. या वर्गांमध्ये पहिल्या वर्षाचे छात्रसुद्धा सहभागी झाले होते. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित रक्तदान शिबिरामध्ये एनसीसी छात्रांनी सक्रीय सहभाग घेतला.

कॅडेट यश पवार याला एनसीसीची FOC-in-C/GOC-in-C शिष्यवृत्ती रु. ४०००/- प्रदान करण्यात आली.

एनसीसीद्वारा 'दीक्षा' मोबाईल प्रणालीमार्फत कॅडेटना कोव्हीड बाबत ओनलाईन प्रशिक्षण देण्यात आले. आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या आठवड्यात छात्रांना ओनलाईन योग प्रशिक्षण देण्यात आले तसेच छात्रांनी घरी योगासनांचा सराव करून योग दिवस साजरा केला. प्रत्येक छात्राने आपल्या सभोवतालच्या परिसरात झाडे लावली. १ ते १५ ऑगस्ट दरम्यान आत्मनिर्भर भारतजनजागृती अभियानाअंतर्गत ओनलाईन माध्यमातून शपथ ग्रहण व पोस्टरमेकिंग उपक्रम घेण्यात आले. १४ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर दरम्यान फिट इंडिया चळवळीअंतर्गत छात्रांनी आपापल्या घरी राहून सायकलिंग, दोरीउड्या, एरोबिक्स, जिना चढउतार यासारखे उपक्रम केले व सोशल मिडियाद्वारे त्यांची प्रसिद्धी केली. यादरम्यान ओनलाईन पोस्टरमेकिंग उपक्रम घेण्यात आला. १ ते १५ डिसेंबर दरम्यान आपापल्या घराभोवतीची स्वच्छता तसेच निबंध लेखन, पोस्टरमेकिंग याद्वारे स्वच्छता पंधरवडा साजरा करण्यात आला. ५ एनसीसी छात्रांनी चार आठवड्यांचे ओनलाईन व्यक्तिमत्व विकास शिबिर पूर्ण केले.

प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी ऑफिसर म्हणून नेव्हल विभागाचे सब-लेफ्टनंट उदय भाट्ये तसेच आर्मी विभागाच्या सौ. सानिका भालेकर यांनी काम पाहिले त्याचप्रमाणे नेव्हल विभागाचा कॅडेट कॅप्टन म्हणून कल्पेश मिरगल याने काम पहिले.